NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या २०१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि.२५ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११: ३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०१ वी बैठक शुक्रवार, दि.२५ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १७) | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ.अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | दि.२४ जुन, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका |
| ठराव: | दि.२४ जुन, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | विभाग |
| | आयत्या वेळेचा विषय क्र. २३ (५) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | तक्रार |
| | पूर्वीचा ठराव | निवारण |
| | दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील विषय क्र. १९ वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने १) डॉ. बब्रुवाहन पांडूरंग रोंगे, प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर २) श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे, सचिव, श्री. विठ्ठल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर व ३) डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि.सोलापूर हे म्हणणे सादर करण्याकरिता उपस्थित होते.<br>उपरोक्तप्रमाणे दोन्हीं पक्षांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले व सभागृह जो काही निर्णय घेईल तो मान्य असल्याबाबत दोन्ही पक्षांना विचारणा केली असता, दोंन्ही पक्षांनी ते मान्य केले. त्यानुसार त्यावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.<br>१. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना संस्था / महाविद्यालयाने ₹७,१७,०००/- इतकी रक्कम, अनुभव प्रमाणपत्र व चारित्र्य प्रमाणपत्र द्यावेत.<br>२. संस्था/महाविद्यालयाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना Terminate न करता त्यांच्याकडून राजीनामा घ्यावा.<br>३. डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांनी संस्था/महाविद्यालयावरील सर्व न्यायालयीन प्रकरणे काढून घ्यावीत.<br>४. वरील सर्व बाबी मान्य असल्याबाबत रजिस्टर्ड कागदपत्र अटीसह तयार करुन घ्यावेत व त्यासाठी होणारा खर्च दोंन्ही पक्षांनी अर्धा-अर्धा करावा.<br>त्यानंतर उपरोक्त निर्णय दोंन्ही पक्षांना मान्य असल्याबाबत सभागृहाने विचारणा केली असता, डॉ. बब्रुवाहन पांडूरंग रोंगे यांनी मान्य असल्याचे सांगितले व डॉ. संतोष भारत साळुंखे यांनी अमान्य असल्याचे सांगितले.<br>डॉ. संतोष भारत साळुंखे यांनी अमान्य केल्याच्या अनुषंगाने त्यावर सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यानुसार खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.<br>"डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि.सोलापूर यांनी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर व इतर यांच्याविरुध्द प्रस्तुत विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे दाखल केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीने दिलेले निकाल व परिनियम ३३५ नुसार केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अमान्य करण्यात आली व सभागृहाचा खालील निर्णय अर्जदार व पक्षकार यांना कळवावा असे सर्वानुमते ठरले."<br>१. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना संस्था/ महाविद्यालयाने ₹७,१७,०००/- इतकी रक्कम, अनुभव प्रमाणपत्र व चारित्र्य प्रमाणपत्र द्यावेत.<br>२. संस्था/महाविद्यालयाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना Terminate न करता त्यांच्याकडून राजीनामा घ्यावा.<br>३. डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांनी संस्था/महाविद्यालयावरील सर्व न्यायालयीन प्रकरणे काढून घ्यावीत.<br>४. वरील सर्व बाबी मान्य असल्याबाबत रजिस्टर्ड कागदपत्र अटीसह तयार करुन घ्यावेत व त्यासाठी होणारा खर्च दोंन्ही पक्षांनी अर्धा-अर्धा करावा. | कक्ष |

दुरुस्त केलेला ठराव

दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील विषय क्र. १९ वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने १) डॉ. बब्रुवाहन पांडूरंग रोंगे, प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर २) श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे, सचिव, श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर व ३) डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर हे म्हणणे सादर करण्याकरिता उपस्थित होते.

उपरोक्तप्रमाणे दोन्हीं पक्षांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले व सभागृह जो काही निर्णय घेईल तो मान्य असल्याबाबत दोन्ही पक्षांना विचारणा केली असता, दोंन्ही पक्षांनी ते मान्य केले. त्यानुसार त्यावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

१. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना संस्था / महाविद्यालयाने ₹७,१७,०००/- इतकी रक्कम, अनुभव प्रमाणपत्र व चारित्र्य प्रमाणपत्र द्यावेत.
२. संस्था/महाविद्यालयाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना Termination मागे घेवून त्यांच्याकडून राजीनामा घ्यावा.
३. डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांनी संस्था/महाविद्यालयावरील सर्व न्यायालयीन प्रकरणे काढून घ्यावीत.
४. वरील सर्व बाबी मान्य असल्याबाबत रजिस्टर्ड कागदपत्र अटीसह तयार करुन घ्यावेत व त्यासाठी होणारा खर्च दोंन्ही पक्षांनी अर्धा-अर्धा करावा.

त्यानंतर उपरोक्त निर्णय दोंन्ही पक्षांना मान्य असल्याबाबत सभागृहाने विचारणा केली असता, डॉ. बब्रुवाहन पांडूरंग रोंगे यांनी मान्य असल्याचे सांगितले व डॉ. संतोष भारत साळुंखे यांनी अमान्य असल्याचे सांगितले.

डॉ. संतोष भारत साळुंखे यांनी अमान्य केल्याच्या अनुषंगाने त्यावर सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यानुसार खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

"डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी, पो. शेळवे, ता. पंढरपूर, जि.सोलापूर यांनी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर व इतर यांच्याविरुध्द प्रस्तुत विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे दाखल केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीने दिलेले निकाल व परिनियम ३३५ नुसार केलेल्या शिफारशीवरती चर्चा करुन सभागृहाचा खालील निर्णय अर्जदार व पक्षकार यांना कळवावा असे सर्वानुमते ठरले."

१. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना संस्था/ महाविद्यालयाने ₹७,१७,०००/- इतकी रक्कम, अनुभव प्रमाणपत्र व चारित्र्य प्रमाणपत्र द्यावेत.
२. संस्था/महाविद्यालयाने डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांना Termination मागे घेवून त्यांच्याकडून राजीनामा घ्यावा.
३. डॉ. संतोष भारत साळुंखे, खेड भाळवनी यांनी संस्था/महाविद्यालयावरील सर्व न्यायालयीन प्रकरणे काढून घ्यावीत.
४. वरील सर्व बाबी मान्य असल्याबाबत रजिस्टर्ड कागदपत्र अटीसह तयार करुन घ्यावेत व त्यासाठी होणारा खर्च दोंन्ही पक्षांनी अर्धा-अर्धा करावा.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | प्रस्तुत विद्यापीठाचा Institution Development Plan (IDP) आयक्युएसीच्या शिफारसीन्वये माहितीस्तव.<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात संस्थात्मक विकास योजना (IDP) ही विद्यापीठाच्या मूलभूत ध्येयधोरणांशी सुसंगत असलेली एक सर्वसमावेशक व रणनीतिक रूपरेषा आहे, जी विद्यापीठाच्या प्रगती व परिवर्तनासाठी मार्गदर्शक ठरते. ही योजना विद्यापीठाच्या अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन उद्दिष्टांची सिद्धता आणि त्या उद्दिष्टांप्रती असलेल्या कटिबद्धतेला अधोरेखित करते.<br>या मुद्दयावर आधारीत सदर योजना विद्यापीठाच्या कार्यप्रणालीच्या आठ महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रीत करते प्रशासन, शैक्षणिक कार्य, संशोधन, मानवी संसाधने, अर्थविवस्था, जाळे व सहकार्य, भौतिक व डिजिटल पायाभूत सुविधा. याची अंमलबजावणी शक्य आणि परिणामकारक होण्यासाठी टप्प्याटप्प्याने राबवण्याच्या दृष्टिकोनातून आखण्यात आलेली आहे. सदर योजनेतील मार्गदर्शक सुचनांचा अवलंब विद्यापीठाची भविष्यातील जडण घडणी होणे अपेक्षित आहे.<br>सदर योजना तयार करण्यास्तव विद्यापीठ स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने IDP तयार करुन IQAC च्या दि. ०५/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर केला असता The Institutional Development Plan (IDP) is accepted and recommended to Academic Council (AC) and Management Council (MC) for Information. उक्त ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठाचा Institution Development Plan (IDP) आयक्युएसीच्या शिफारसीन्वये माहितीस्तव. | आयक्युएसी विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाचा Institution Development Plan (IDP) आयक्युएसीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ३ ]</td><td>

**प्रस्तुत विद्यापीठात University Department Ranking Framework (UDRF) उपक्रम अमलबजावणी करणेबाबत IQAC ची शिफारस माहितीस्तव.**

टिपणी: शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२५/ई-१०१८३७२/विशि-३ दिनांक- ०७ मार्च, २०२५ अन्वये राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावून त्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अग्रगण्य ओळख मिळवून देण्यासाठी विद्यापीठातील विविध विभागांकडून चालना देणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा अंतर्गत विविध नाविण्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविणे, कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि जबाबदारी आणणे व एक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठांतर्गत शैक्षणिक विभागांना NIRF व QS Ranking च्या विविध मानदंड आणि निकषावर आधारित विद्यापीठांतर्गत विभाग मानांकन देण्याचा उपक्रम सर्व अकृषि सार्वजनिक विद्यापीठांकडून राबविण्याच्या मार्गदर्शक सुचना उक्त शासन निर्णयान्वये कळविण्यात आले आहे.

प्रस्तूत विद्यापीठात सदर उपक्रम दरवर्षी दि. ०१ जुलै ते दि. ३०जून या शैक्षणिक वर्षातील विभागांच्या शैक्षणिक, संशोधन आणि इतर कामगिरीच्या आधारित राबविण्यास उक्त शासन निर्णयामधील मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच यावर्षीचा सदर उप्रकम अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे मुल्यांकन पुर्ण करणेसाठी मा.कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशित केल्यानुसार खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात आली आहे.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>पद</th><th>नामनिर्देशन</th></tr>
<tr><td>१.</td><td>अध्यक्ष</td><td>प्रा.डॉ.एम.एस. कुऱ्हाडे, संचालक डिटीएसएस, मुंबई.</td></tr>
<tr><td>२.</td><td>सदस्य</td><td>प्रा.डॉ. हरम संतोष, एसपीपीयु, पुणे.</td></tr>
<tr><td>३.</td><td>सदस्य</td><td>प्रा.डॉ. वैशाली बामबोले, मुंबई विद्यापीठ, मुंबई.</td></tr>
</table>

सदर उपक्रम राबविण्यासाठी सदर विषय आयक्युएसीच्या दि. ०५/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर केला असता It was resolved that, to initiate University Department Ranking Framework (UDRF) to university campus schools from the academic year (१ July (Previous Year) § ३० June (Current year)) as per the Government of Maharashtra GR dated ७th March,२००२५.

Further, it was recommended that UDRF process and guidelines to be placed before Board of Dean, Academic Council (AC) and Management Council (MC) for information. ठरावानुसाद विद्या परिषद व व्यवस्थापन परिषद समोर सादर करण्यास अंतर्गत गुणवत्ता प्रामाणिकरण कक्ष समितीने शिफारस केली आहे. सदर बाब माहितीस्तव.

</td><td>आयक्युएसी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**प्रस्तुत विद्यापीठात University Department Ranking Framework (UDRF) उपक्रम अमलबजावणी करणेबाबत IQAC ने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी ३० गुंठे जागा उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: उपरोक्त विषयान्वये सोलापूर विद्यापीठ परिसरामध्ये आदिवासी मुलींचे व मुलींचे नविन टाईप प्लॅननुसार (G+३) बांधकामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडे सादर केले होते. तेंव्हा आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे G+३ चे इमारत बांधकाम झालेले असुन आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहाचे बांधकाम होणे बाकी आहे. तरी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर परिसरामध्ये आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहाचे बांधकाम करणेकरीता वसतिगृहासाठी संदर्भ क्र.२ व ३ च्या अधिन राहुन ३० गुंठे जागा उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भ क्र. ०१ च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सन २००८-०९ या वर्षात व त्यानंतर टप्प्याटप्प्याने खालीलप्रमाणे १४० वसतिगृहे सुरु करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दरवर्षी सुरु करावयाच्या वसतिगृहांचा कालबध्द आराखडा तयार करुन प्रत्येक टप्प्यात सुरु करावयाच्या वसतिगृहासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद त्या त्या वर्षात करण्यासाठीचे प्रस्ताव शासनास पाठवावेत. संदर्भ क्र.०३ च्या शासन निर्णयानुसार सोलापूर विद्यापीठ क्षेत्रात बांधण्यासाठी आवश्यक असलेली विद्यापीठाची जागा आदिवासी विकास विभागास लीजवर देण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे कलम ८ (१) (ड) नुसार खालील अटीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.<br>१) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ०६/१२/२००७ च्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.<br>२) लीजवर जागेसाठी द्यावयाच्या दरासंदर्भात आदिवासी विकास विभाग तसे सार्वजनिक बांधकाम विभागाशी आवश्यक्तेप्रमाणे विचारविनिमय करुन दर निश्चित करण्यात येईल. | अभियांत्रिकी विभाग |

| | |
|---|---|
| | ३) जमीनीची मालकी विद्यापीठाकडेच राहील.<br>४) वसतिगृहाच्या बांधकामासाठी संपुर्ण निधी आदिवासी विभागाकडून वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>५) वसतिगृहासाठी लागणारा कर्मचारीवृंद आदिवासी विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यांची संपुर्ण सेवा विषयक जबाबदारी त्याविभागाची राहील.<br>६) वसतिगृहाच्या प्रशासन विषयक कामकाजावर आदिवासी विकास विभागाचे नियंत्रण राहील.<br>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.<br>१) सदर वसतिगृहाची इमारत (बांधकाम, विद्युतीकरण, आकस्मिक खर्च, मेस फर्निचर व इतर) खर्च शासनाने करावा.<br>२) सदर वसतिगृहात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी समुदांतील विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येईल.<br>३) जर काही जागा शिल्लक राहिल्याद त्या जागा विद्यापीठामार्फतच इतर संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून भरण्यात येतील.<br>४) जमिनीची मालकी विद्यापीठाकडेच राहल.<br>असे त्यांना ना हरकत प्रमाणपत्र संदर्भ क्र.०३ च्या पत्रान्वये देण्यात आले होते.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे G+३ चे इमारत बांधकाम झालेले आहे. आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह G+३ बांधकाम होणे बाकी आहे.<br>सबब, आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह (G+३) बांधकामासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना विद्यापीठ परिसरात जागा कुठे व किती उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ. |
| ठराव: | **आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह (G+३) बांधकामासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना सदर विषयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांना देण्यात आलेल्या जागेमधील शिल्लक राहिलेल्या जागेतील ३० गुंठे जागा मुलांच्या वसतिगृहासाठी उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच दोन वर्षात बांधकाम चालू नाही झाल्यास दिलेल्या जागेसंदर्भात पुनश्च: विचार करण्यात येईल असेही सर्वानुमते ठरले.** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ५ ] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता शासकीय वसतिगृहासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सोलापूर जिल्हयात अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती व इतर दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी एकूण १६ मुलांचे /मुलींचे शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी सोलापूर शहरात अशोक नगर, विजापूर रोड येथे आहे. सद्यस्थितीत विद्यापीठामध्ये सुमारे ५०० विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेत असुन त्यापैकी अंदाजे २०० विद्यार्थी (मुले/मुली) शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यामुळे स्वाधार योजनेचा लाभ घेत आहेत. सद्यस्थितीत कार्यरत असलेली वसतिगृहे ही विद्यापीठ परिसरापासून खूप दूर अंतरावर (२० किमी) आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना ये-जा करणे त्रासदायक होत आहे. त्यामुळे सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, सोलापूर यांनी विद्यापीठ परिसरात १०० विद्यार्थी क्षमतेची दोन वसतिगृहे (मुले+मुली) बांधकामाकरिता पाच एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भाकिंत पत्रान्वये मागणी केलेली आहे.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुलांचे ०१ व मुलींचे ०१ वसतिगृह उपलब्ध आहे. सदर वसतिगृहांची प्रवेश क्षमता कमी असल्यामुळे अनेक अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती व इतर दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत नाही. प्रस्तुत विद्यापीठात विविध अभ्यासक्रमासाठी ग्रामीण भागातील अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती व इतर दुर्बल घटकांतील विद्यार्थी मोठया संख्येने प्रवेश घेतात.<br>सद्यस्थितीमध्ये दरवर्षी विद्यापीठात सुमारे १००० मागासवर्गीय विद्यार्थी विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात. तसेच आगामी शैक्षणिक वर्षापासून आणखीन नवीन विविध कोर्स सुरु करण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणखी वाढेल. विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील असल्यामुळे विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था सक्षम करणे खूपच गरजेचे आहे. | अभियांत्रिकी विभाग |

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तुत विद्यापीठातील मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता प्रत्येकी २०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वसतिगृह, अभ्यासिका हॉल, टी.व्ही हॉल, इंटरनेट सुविधा, स्वयंपाक घर, भोजन कक्ष, अधिक्षक कार्यालय, मिटींग हॉल व गृहपाल निवास उभारणी करुन मिळणे आवश्यक आहे. तरी आपण मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता प्रत्येकी १०० ऐवजी २०० विद्यार्थी क्षमतेची दोन वसतिगृहे उपलब्ध करुन दिल्यास विद्यार्थ्यांच्या निवासाची उत्तम सोय होईल व मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहणार नाही.<br>सबब, मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता प्रत्येकी २०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे दोन वसतिगृह बांधकामासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सोलापूर यांना विद्यापीठ परिसरात जागा कुठे व किती उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता प्रत्येकी २०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे दोन वसतिगृह बांधकामासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सोलापूर यांना विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांना देण्यात आलेल्या जागेमधील शिल्लक असलेली जागा मुलांच्या वसतिगृहासाठी ३० गुंठे व आरोग्य केंद्राच्या जागेमधील ३० गुंठे जागा मुलींच्या वसतिगृहासाठी उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच एकूण बांधकामाच्या एफ.एस.आय. प्रमाणे जागा देण्यात यावी व दोन वर्षात बांधकाम चालू नाही झाल्यास दिलेल्या जागेसंदर्भात पुनश्च: विचार करण्यात येईल असेही सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६ ] | **दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र. १५(५) वर प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी पारित झालेल्या ठराव दुरुस्तीची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: याबाबत कार्यालयीन निवेदन खालीलप्रमाणे:<br>दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र. १५(५) वर पारित ठराव अवलोकनार्थ सादर.<br>उपरोक्त प्रमाणे व्यवस्थापन परिषदेचा विषय व ठराव खालीलप्रमाणे आहे:<br>विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>ठराव: "प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्था प्रचलित पध्दतीने करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले."<br>उपरोक्त ठरावाप्रमाणे दीक्षांत समारंभादिवशी विद्यापीठ प्राधिकरणाच्या सदस्यांची बैठक व्यवस्था कशी करावी याबद्दल विभागामध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. याबाबत कार्यालयीन निवेदन खालीलप्रमाणे:<br>१) दीक्षांत समारंभादिवशी विद्यापीठ प्राधिकरणांच्या सदस्यांची बैठक व्यवस्थेबाबत दि. १६ जानेवारी, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. ११(८) खालीलप्रमाणे आहे:<br>ठराव: "प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात यावी व विद्यापरिषद सदस्य यांची मंडपामध्ये अग्रस्थानी (सुरुवातीच्या पहिल्या रांगेत) बैठक व्यवस्था करण्यात यावी असे ठरले."<br>२) दि. ०५/०२/२०२४ रोजी एकोणीसाव्या दीक्षांत समारंभाच्या आढावा बैठकीमध्ये श्री. अ.बा.जाधव, सहायक कुलसचिव यांनी विद्यापरिषद सदस्यांचा समावेश व्यासपीठावरील बैठकीमध्ये करण्याबाबत मुद्दा उपस्थित केला. सदर मुद्दा दि.०६ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव पारित झाला.<br>ठराव: "प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंदर्भात दि. १६ जानेवारी, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ११(८) प्रमाणे कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले." | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |

३) कुलसचिव कार्यालयाकडून दि. २५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीअन्वये सोलापूर विद्यापीठ शिक्षक (सुटा), सोलापूर या संघटनेच्या पत्रात नमूद विषय क्र. ३ वरील ठराव पुढील कार्यवाहीसाठी दीक्षांत विभागाकडे पाठविण्यात आला होता. तो ठराव खालीलप्रमाणे आहे

विषय: Precedence Statute ५४९ नुसार दीक्षांत समारंभासाठी बैठक व्यवस्था करणेबाबत.

ठराव: "Precedence Statute ५४९ नुसार दीक्षांत समारंभासाठी बैठक व्यवस्था करताना पदवी प्रदान करणाऱ्या विद्यापरिषद सदस्यांना नियमानुसार व्यासपीठावर उपस्थित राहता येईल. याबाबत आवश्यक तो ठरावातील बदल करण्यात येईल."

४) उपरोक्त मुद्दा क्र. ०३ नुसार विद्यापीठ प्राधिकरणांच्या सदस्यांचा दीक्षांत समारंभामधील बैठक व्यवस्थेबाबतचा विषय दि. २९ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर केला असता खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

ठराव: "प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्था प्रचलित पध्दतीने करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले."

मुद्दा क्र. ०४ मध्ये नमूद ठरावामध्ये प्रचलित पध्दतीने हा शब्दप्रयोग असल्याने बैठक व्यवस्थेच्या अनुषंगाने नेमकी कोणती कार्यवाही करावी याबाबत अडचण निर्माण होत आहेत. तरी सदर ठराव दुरुस्त होऊन मिळाल्यास व्यासपीठावरील बैठक व्यवस्था करणाऱ्या समितीस कार्यवाही करणे सोयीचे होईल.

सबब, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र. १५(५) वर प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी पारित झालेल्या ठराव दुरुस्तीची बाब विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात यावी व विद्यापरिषद सदस्य यांची व्यासपीठासमोरील मंडपामध्ये अग्रस्थानी बैठक व्यवस्था करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | **आक्टोबर/नोव्हेंबर २०२५ या परीक्षा सत्राकरिता गोपनीय "Code-B" यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मार्च/एप्रिल २०२५ या परीक्षा सत्राकरिता प्रश्नपत्रिका छपाई साठी गोपनीय "Code-B" यांना दि.०१/०४/२०२५ रोजी प्रति पेज रु.२४५/- दराने प्रश्नपत्रिका व रु.२५०/- दराने ग्राफ पेपर शिट छपाई ई. कामाकरिता पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर पुरवठा आदेशामध्ये अनुक्रमांक ५. नुसार खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे:<br>५. This Order is made for the Examination of March/April २०२५ event of all examinations conducted by the University and till the said examination event is over which is more particularly specified in the work order issued in this regard. If the services of the service provider are satisfactory then the present agreement may be extended for another period with mututal consent of the parties by taking proper approval of university authority.<br>समाधानकारक काम असल्यास सदर पुरवठा आदेशामध्ये नमूदप्रमाणे प्राधिकरणाच्या मान्यतेने एका सत्राकरिता मुदतवाढ देण्यात येईल असे नमूद आहे. मार्च/एप्रिल २०२५ या परीक्षा सत्रात संबंधित "Code-B" गोपनीय प्रेसने समाधानकारक काम केलेले आहे. त्यामुळे मार्च/एप्रिल २०२५ परीक्षा सत्राकरिता ज्या दराने पुरवठा आदेश दिलेला आहे, त्याच दराने आक्टोबर/नोव्हेंबर २०२५ या परीक्षा सत्राकरिता मुदतवाढ देण्यात यावे अशी विभागाची धारणा आहे.<br>सबब, आक्टोबर/नोव्हेंबर २०२५ या परीक्षा सत्राकरिता गोपनीय "Code-B" यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या आक्टोबर/नोव्हेंबर २०२५ या परीक्षा यापूर्वी मार्च/एप्रिल, २०२५ परीक्षा सत्राकरीता असलेल्या "Code-B" या गोपनीय प्रेसला मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे पूर्नपुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ८ ] | प्रस्तुत विद्यापीठाच्या https://www.sus.ac.in/ या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभालीकरिताचा करार नूतनीकरणाच्या अनुषंगाने ड्रिम कम्प्युटर, कोल्हापूर यांना Annual Maintenance Charges म्हणून रु.१,०५,२५०/- आदा करावयाच्या देयकाची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे संकेतस्थळ https://www.sus.ac.in/ चा Design & Development च्या अनुषंगाने ऑगस्ट २०१९ पासून ड्रिम कम्प्युटर, कोल्हापूर यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या सेवेचा वाषिर्क करार दि. ०५/०८/२०२५ रोजी संपणार आहे. ड्रिम कम्प्युटर, कोल्हापूर यांच्याकडून सदर संकेतस्थळाच्या Annual Maintenance Charges (AMC) करिता एक वर्षाच्या कालावधीसाठी सेवा घ्यावयाची आहे. (For period ०५ August २०२५ to ०४ August २०२६). सदरची सेवा घेण्याकरिता संबंधीत पुरवठाधारकाबरोबर करार करावयाचा असल्याने सोबत कराराची नमुना प्रत व ड्रिम कम्पुटर, कोल्हापूर कंपनीकडून प्राप्त देयक प्रत जोडण्यात आले आहे. उक्त कालावधीसाठी प्रस्तुत विद्यापीठ संकेतस्थळाच्या देखभालीच्या अनुषंगाने पुरवठा धारकाकडून घेण्यात येणाऱ्या सेवेचे Annual Maintenance Charges (AMC) चे देयक अदा करण्याकरिता खालील बाबी मान्यतेस्तव सादर.<br>१. वर नमूद (For period ५ August २०२५ to ४ August २०२६) या एक वर्षाची सेवा करार करण्यास मान्यता असावी. सदर करारासाठी रुपये १,०५,२५०/- (एक लाख पाच हजार दोनशे पंन्रास रुपये) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या खर्चाचे देयक आदा करण्यास मान्यता असावी.<br>२. तसेच सदर कराराच्या AMC चा नमूना (Draft) कायदा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांचे कडून तपासणी करुन घेण्यास मान्यता असावी.<br>३. करारानंतर नमूद कालावधी करीता सेवा देण्याबाबत संबंधित फर्मला पुरवठा आदेश देण्यास मान्यता असावी.<br>४. उपरोक्त खर्चाची रक्कम परीक्षा विभागाच्या AMC Charges for Hardware & Software या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास व उक्त फर्मला देयक अदा करण्यास मान्यता असावी.<br>५. सदर फर्मकडून विद्यापीठास मिळणारी सेवा समाधान कारक आहे. सदरची बाब विचारात घेता पुढील AMC (Annual Maintenance Charge) १००% अग्रीम (Advance) आदा करण्यास मान्यता असावी.)<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या https://www.sus.ac.in/ या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभालीकरिताचा करार नूतनीकरणाच्या अनुषंगाने ड्रिम कम्प्युटर, कोल्हापूर यांना Annual Maintenance Charges म्हणून रु.१,०५,२५०/- आदा करावयाच्या देयकाची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठाच्या https://www.sus.ac.in/ या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभालीकरिताचा करार नूतनीकरणाच्या अनुषंगाने ड्रिम कम्प्युटर, कोल्हापूर यांना Annual Maintenance Charges म्हणून ₹१,०५,२५०/- आदा करावयाच्या देयकास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ९ ] | प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आलेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासाठी Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund मधील बाब क्र.१३ मध्ये तरतूद केलेल्या रक्कमेत सुधारणा करण्यासंदर्भातील बाब विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठाकडे महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रूपये १०/- या प्रमाणे आपत्कालीन निधी जमा झालेल्या व यापुढे जमा होणा-या रकमेवरील व्याजाच्या रकमेचा विनियोग करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. २०१३/प्र. क्र. ३२२/१३/विशि-३<br>दि.१९ ऑक्टोबर, २०१३ नुसार पुढील बाबीसाठी करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.<br>१. प्रत्येक विद्यापीठामध्ये असलेल्या आपत्ती व्यवस्थापन कक्षातील प्रत्येक व्यक्ती प्रशिक्षीत असणे आवश्यक आहे व त्यांचेद्वारे शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करण्याच्या सुविधा निर्माण करणे, अभ्यासक्रम तयार करणे इत्यादी.<br>२. प्रथमोपचारासाठी प्रशिक्षित कर्मचारी व आरोग्य विषयक इतर सोयी सुविधा उपलब्ध करणे.<br>३. पाण्याचा पुरेसा साठा करण्यासाठी पाण्याच्या टाक्या उपलब्ध करणे.<br>४. अग्निशामक उपकरणे उपलब्ध करणे.<br>५. कर्मचा-यांसाठी व विद्यार्थ्यांसाठी धोक्याची सूचना देणारी यंत्रणा (उदा. कॉमन अनाऊन्समेंट सिस्टीम, ॲलर्ट बझर सिस्टीम, एसएमएस सेवा इत्यादी) उपलब्ध करणे.<br>६. विद्यापीठ तसेच महाविद्यालयामध्ये आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांचे संच (उदा. स्ट्रेचर, रोप, ट्री कटर, हूक, ड्रेन क्लीनर, पाण्यात तरंगता येतील असे फ्लॉटर्स इत्यादी)<br>७. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाची माहिती जनतेला देण्यासाठी रस्त्यावर रॅली काढण्यासाठी अर्थसहाय्य करणे.<br>त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून आपत्कालीन निधी पोटी जमा झालेल्या निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासंदर्भात प्रस्तुत विभागाने संदर्भ २ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेकडून Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund साठी मान्यता घेतली होती. सदर Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund मधील बाब अ.क्र. १३ नुसार विद्यापीठासाठी रुग्णवाहिका घेण्यासाठी रु.८,००,००० इतकी रक्कम तरतूद मंजूर | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात आलेली होती. सदरचा विषय नोव्हेंबर २०१८ मधील झालेल्या बैठकीत मंजूर झालेला होता मात्र दरम्यानच्या काळात काही कारणास्तव सदर निधी खर्ची पडलेला नाही. संदर्भ ३ नुसार सद्यस्थितीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून आपत्कालीन निधी पोटी जमा झालेल्या निधीवरील व्याजाची रक्कम रु.२५,५८,८१७/- इतकी असून ती अद्याप खर्ची पडलेली नाही. सदर अखर्चित निधीमधून विद्यापीठ आरोग्य केंद्रासाठी Basic Life Support रुग्णवाहिका खरेदी करण्यासंदर्भात मा. कुलगुरू महोदय यांनी सूचना केलेली आहे.<br>संदर्भ ४ नुसार सद्यस्थिती मध्ये Basic Life Support स्वरुपाची रुग्णवाहिकेच्या किमती किमान रु.१४ लाख ते २० लाख पर्यंत असून २०१८ साली रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी केलेली रु.८,००,०००/- लाखाची तरतूद अपुरी पडणार आहे. त्या अनुषंगाने सदर तरतूद वाढवून रु.२०,००,०००/- लाख इतकी करण्याची आवश्यकता आहे.<br>सबब प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आलेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासाठी Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund मधील बाब क्र. १३ मध्ये तरतूद केलेल्या रक्कमेत सुधारणा करण्यासंदर्भातील बाब विचारार्थ. | |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आलेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासाठी Proposed Plan for Utilization of Interest on Disaster Fund मधील बाब क्र.१३ मध्ये तरतूद केलेल्या रक्कमेत सुधारणा करण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच आपत्कालीन परिस्थितीत कॉरपसचे व्याज कमी पडत असेल तर विद्यापीठ सामान्य निधीतून (General Fund) वापरण्यास व आपत्कालीन परिस्थितीसाठी Cardiac Ambulance नवीन खरेदी करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **लोककला महोत्सवाची रुपरेषा ठरविण्यासाठी दि.२५/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील शिफारशी विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठात प्रतिवर्षी लोककला महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत लोककला महोत्सवाची रुपरेषा ठरविण्यासाठी मा. कुलगुरु महोदय नामनिर्देशित सदस्याची बैठक दि.२५/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीत लोककला महोत्सव स्वंतत्र आयोजित करण्याच्या अनुषंगाने विविध विषयावर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत नविन कलाप्रकार समाविष्ठ करण्यास व त्यासाठी आसलेली नियमावलीबाबत तसेच युवा महोत्सवातून काही कलाप्रकार वगळून ते लोककला महोत्सवात समाविष्ट करणे व लोककला महोत्सवाच्या आयोजनासाठी होणाऱ्या खर्चाच्या तरतुदीबाबत शिफारस करण्यात आली आहे. तरी लोककला महोत्सवाची रुपरेषा ठरविण्यासाठी दि.२५/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील शिफारशी विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **लोककला महोत्सवाचे आयोजन ललितकला संकूलामार्फत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच ललितकला संकूलामधील मूळ अंदाजपत्रकीय तरतूदीत एक स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करुन त्यामध्ये अंदाजपत्रकीय तरतूद वाढवून घेण्यात यावे असे ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरण्याची बाब पुनश्च: विचारार्थ.**<br>टिपणी: प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरण्याची बाब दि. २४ जून, २०२५ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर केले असता, सदर बैठकीतील ठराव क्र. ०५ नुसार, सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>त्या अनुषंगाने सादर करण्यात येते की,<br>१. दि. २२ जुलै, २००४ च्या अधिसूचनेनुसार शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूर येथील पदव्युत्तर विद्यापीठ उपकेंद्राचे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या नावाने सोलापूर जिल्हाकरिता स्वतंत्र विद्यापीठ स्थापन झाले.<br>२. त्यानंतर शासन निर्णय क्र. दि. १९/०९/२००९ च्या आकृतीबंधानुसार १२ पदे प्रयोगशाळा परिचर व ०३ पदे ग्रंथालय परिचर या पदास मान्यता मिळाली. सदरची दोन्ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरणे आवश्यक होते. परंतू पदोन्नतीसाठी वर्ग ४ मधून कर्मचारी उपलब्ध नसल्याने ते सरळसेवेने भरण्यात आली. त्यास दि. २५/०४/२००८ रोजीच्या पत्राने मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे.<br>३. सध्या प्रयोगशाळा परिचरची ०६ पदे व ग्रंथालय परिचरची ०१ पद रिक्त आहे.<br>४. सदर रिक्त पदाकरिता वर्ग ४ मध्ये पात्र कर्मचारी उपलब्ध आहेत.<br>५. त्यामुळे सदरची पदे पदोन्नतीने भरणाची असल्याने त्यास व्यवस्थापन परिषदची मान्यता आवश्यक आहे.<br>६. प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर ही पदे शिवाजी विद्यापीठामध्ये ही पदोन्नतीची प्रक्रिया करुनच भरली जातात. (सोबत सुलभ संदर्भासाठी त्यांचे परिपत्रक जोडलेले आहे.)<br>सबब, प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून पदोन्नतीने भरण्याची बाब पुनश्च: विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर ही पदे वर्ग ४ मधील सेवकातून शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नतीने भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ०५ अनुदानित संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाच्या सामान्य निधीतून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांसाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी सहायक प्राध्यापकांच्या भरतीची प्रक्रिया करुन नियुक्ती आदेश पारित केल्याची बाब माहितीस्तव तथा स्थानिक निवड समितीने शिफारस करुनही आरक्षण व गुणवत्ते अभावी नियुक्ती आदेश पारित न केलेल्या उमेदवारांची संख्या व रिक्त पदांची संख्या ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठात दरवर्षी नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित शिल्लक कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार विद्यापीठ सामान्य निधीतून स्थानिक निवड समितीमार्फत माहे एकत्रित वेतनावर विविध विषयातील तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरली जातात. त्यानुषंगाने विद्यापीठ परिसर संकुलाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा विषयनिहाय कार्यभार या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/आस्था/शिक्षक/२०२४/९४२८, दि. ३०/१२/२०२४ मागविण्यात आला होता.<br>त्यानुसार संबंधित संकुलाच्या संचालकांनी अनुदानित ०५ संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार सादर केल्यानुसार व विद्यापीठाच्या सामान्य निधीतून सुरु असलेल्या संकुलाचा कार्यभार या बाबी विचारात घेवून १३१ पदांसाठी वेळोवेळी बैठका घेवून मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेण्यात आली होती. सदर १३१ पदे भरण्यास व्यवस्थापन परिषदेची दिनांक ०३/०६/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान झालेली आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत संकुलाकडून प्राप्त झालेल्या सुधारित कार्याभारानुसार व मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार ०२ पदांची संख्या कमी झालेली आहे. त्याचप्रमाणे एम. बी. ए. अभ्यासक्रमासाठी ०८ पदांचे आरक्षण स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात आले, तर १२१ पदांचे आरक्षरण स्वतंत्रपणे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार कंत्राटी सहायक प्राध्यापक पदांची भरती प्रक्रिया करुन नियुक्ती आदेश संकुलनिहाय Edu Lab Company मार्फत पारित करण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. | आस्थापना विभाग (शिक्षक) |

| अ.क्र. | संकुलाचे नाव | संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली पदांची संख्या | आरक्षणानुसार व गुणवत्तेनुसार नियुक्ती आदेश पारित केलेली उमेदवारांची संख्या ü | स्थानिक निवड समितीने शिफारस करुनही आरक्षण व गुणवत्ते अभावी नियुक्ती आदेश पारित न केलेल्या उमेदवारांची संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १) | पदार्थविज्ञान संकुल | ०८ | ०७ | ०१ | ०० |
| २) | रसायनशास्त्र संकुल | ११ | ०६ | ०१ | ०४ |
| ३) | भूशास्त्र संकुल | १० | ०४ | ०३ | ०३ |
| ४) | सामाजिकशास्त्रे संकुल | २१ | १६ | ०३ | ०२ |
| ५) | संगणकशास्त्र संकुल | १४ | ०८ | ०३ | ०३ |
| ६) | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल (एम.बी.ए.) | १८ | ०३ (एम.बी.ए.- ०५) | ०३ (एम.बी.ए.- ०३) | ०४ (००) |
| ७) | भाषा व वाङ्मय संकुल | १६ | १२ | ०२ | ०२ |
| ८) | तंत्रज्ञान संकुल | ०८ | ०२ | ०१ | ०५ |
| ९) | ललित कला व कला संकुल | ०९ | ०४ | ०२ | ०३ |
| १०) | आरोग्य विज्ञान संकुल | ०५ | ०२ | ०३ | ०० |
| ११) | जैवशास्त्र संकुल | ०९ | ०६ | ०० | ०३ |
| | एकूण | १२९ | ७५ | २५ | २९ |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ०५ अनुदानित संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाच्या सामान्य निधीतून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांसाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी सहायक प्राध्यापकांच्या भरतीची प्रक्रिया करुन नियुक्ती आदेश पारित केल्याची बाब माहितीस्तव तथा स्थानिक निवड समितीने शिफारस करुनही आरक्षण व गुणवत्ते अभावी नियुक्ती आदेश पारित न केलेल्या उमेदवारांची संख्या व रिक्त पदांची संख्या ही बाब विचारार्थ.

ठराव: **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता स्थानिक निवड समितीने शिफारस करुनही आरक्षण व गुणवत्ते अभावी नियुक्ती आदेश पारित न केलेल्या उमेदवारांची संख्या व रिक्त पदांच्या संख्येबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**तद्नंतर गुणवत्ता यादीनुसार आरक्षणाचा विचार न करता रिक्त पदे भरण्यात येतील असे ठरले. तसेच ५०% पेक्षा कमी गुण मिळालेल्या उमेदवारांसाठी निर्णय घेण्याचे अधिकार मा.कुलगुरुमहोदय यांना देण्यात यावे असे ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि.०१ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार पुरस्कार वितरण करण्याची बाब विचारार्थ.** | आस्थापना विभाग |

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे २१ वे वर्धापन दिन दि.०१/०८/२०२५ रोजी संपन्न होणार असून त्यादिनी विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार
२) उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार
३) उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
४) उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार
५) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ)
६) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय)
७) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग १ व २ (विद्यापीठ)
८) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ३ (विद्यापीठ)
९) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ४ (विद्यापीठ)
१०) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय)
११) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- चतुर्थश्रेणी (महाविद्यालय)

उक्त नमूद पुरस्कारापैकी जीवनगौरव पुरस्कार वगळता इतर १० पुरस्कारांकरीता सर्व संबंधितांकडून अर्ज मागविणेकामी दि. ०४/०६/२०२५ व दि. ३०/०६/२०२५ रोजीचे परिपत्रक निर्गमित करण्यात येऊन त्यानुसार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.०५/०७/२०२५ पर्यंत देण्यात आलेली होती. सदर परिपत्रकास अनुसरुन खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले होते.

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | प्राप्त अर्जांची संख्या |
|---|---|---|
| १) | उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार | ०० |
| २) | उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | ०४ |
| ३) | उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | ०३ |
| ४) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ) | ०० |
| ५) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय) | ०५ |
| ६) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग १ व २ (विद्यापीठ) | ०२ |
| ७) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ३ (विद्यापीठ) | ०४ |
| ८) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ४ (विद्यापीठ) | ०२ |
| ९) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय) | ०२ |
| १०) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- चतुर्थश्रेणी (महाविद्यालय) | ०३ |

उपरोक्तप्रमाणे नमूद १० पुरस्कारांकरीता विविध निवड समित्या गठीत करण्यात आलेल्या होत्या. सदर समितीने आदर्श नियमावलीतील नमूद तरतुदींचे अवलोकन करुन संबंधित पुरस्करांकरीता पुरस्कर्त्यांच्या नावांची शिफारशी सादर केलेले आहेत.

तसेच उक्त पुरस्कारापैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्काराकरीता मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय शोध समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीची बैठक दि. १६/०७/२०२५ रोजी विद्यापीठामध्ये संपन्न होऊन शोध समितीने सदर पुरस्काराकरीता पुरस्कर्त्याची निवड करुन त्यांचा अहवाल सादर केलेला आहे.

उक्त नमूद सर्व ११ पुरस्काराकरीता गठीत निवड/शोध समितीने गोपनीय पध्दतीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन सर्व संबंधित पुरस्कर्त्यांना विद्यापीठाच्या २१ व्या वर्धापनदिनी म्हणजेच दि. ०१/०८/२०२५ रोजी प्रदान करण्यात येणार आहेत.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार पुरस्कार वितरण करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या खालील पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार खालीलप्रमाणे पुरस्कार वितरण करण्यास खालीलप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | |
|---|---|
| उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार | निरंक. |
| उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | व्ही. जी. शिवदारे आर्टस्, कॉमर्स व सायन्स, महाविद्यालय, सोलापूर |
| उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | प्राचार्य डॉ. विजय अनंत आठवले<br>वालचंद कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर |
| उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ) | निरंक. |
| उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय) | डॉ. भाग्येश बलवंतराव देशमुख<br>वालचंद कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग १ व २ (विद्यापीठ) | श्री. राजीव उत्तमराव खपाले<br>पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ३ (विद्यापीठ) | डॉ. शिरीष शामराव बंडगर<br>पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ४ (विद्यापीठ) | श्री. नवनाथ भागनाथ ताटे<br>पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय) | श्री. राजेंद शंकर गिड्डे |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- चतुर्थश्रेणी (महाविद्यालय) | १) श्री. दत्ता भोसले<br>छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर<br>२) श्री. रेवप्पा सिध्दप्पा कोळी<br>संगमेश्वर कॉलेज, सोलापूर |
| जीवनगौरव पुरस्कार | श्रीमती मंगलाताई शहा<br>प्रभा-हिरा प्रतिष्ठान, पालवी संकुल, पंढरपूर |

दि.२९/०८/२०२५ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देण्यात येणारे खालील पुरस्कार

क्रीडाक्षेत्र पुरस्कार

| | | | |
|---|---|---|---|
| | उत्कृष्ट क्रीडा पत्रकारीता | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | |
| | उत्कृष्ट क्रीडा शिक्षक | श्री. संतोष धर्मा खेंडे | |
| | उत्कृष्ट शरिरीक शिक्षण संचालक / प्राध्यापक (वरिष्ठ विभाग) | डॉ. आनंद चव्हाण<br>संगमेश्वर कॉलेज, सोलापूर | |
| | उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक | १) श्री. श्रीकांत गंगाधर शेटे<br>२) श्री. शरणबसवेश्वर सिध्दाराम वांगी | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १४ ] | **अहिल्यारत्न पुरस्काराची नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने तयार केलेली नियमावली विचारार्थ.** | आस्थापना विभाग |

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवानिमित्त वर्षभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यतेखाली जयंती उत्सव समितीची बैठक संपन्न झाली. सदर समितीच्या बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे विद्यापीठाचे नाव असल्या कारणाने त्रि-शताब्दी वर्षाचे औचित्य साधून यावर्षीपासून विद्यापीठामार्फत देश व महाराष्ट्र पातळीवर शिक्षण, संशोधन, साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा, प्रशासन व पर्यावरण या क्षेत्रामध्ये उल्लेखनिय व भरीव योगदान देणा-या मान्यवर व्यक्तींसाठी अहिल्यारत्न हा पुरस्कार सुरु करण्याबाबत विचार मांडण्यात आला होता.

विद्यापीठामार्फत अहिल्यारत्न पुरस्कार सुरु केल्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा जनमानसामध्ये रुजवला जाईल व विविध क्षेत्रात कार्य केलेल्या मान्यवरांना पुरस्कार दिल्याने राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाची एक वेगळी ओळख निर्मा होईल. त्यानुसार यावर्षीपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि-शताब्दी जयंती उत्सवानिमित्त अहिल्यारत्न पुरस्कार सुरु करण्यास तसेच सदर पुरस्कारासाठी नियमावली तयार करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्या नामनिर्देशाने ५ सदस्यीय समिती गठीत केली होती. सदर समितीची बैठक दि.०७/०७/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता आयक्युएसी विभागात संपन्न झाली. सदरच्या गठीत समितीने अहिल्यारत्न पुरस्काराकरिता खालीलप्रमाणे नियमावली तयार केलेली आहे.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्कार: नियमावली

कला, संस्कृती, साहित्य, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, कृषी, उद्योग व व्यापार, पर्यावरण, जल व्यवस्थापन, आदी क्षेत्रांपैकी एका किंवा अधिक क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding / Extraordinary Contribution) देणाऱ्या व्यक्तीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा "अहिल्यारत्न" पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

१. पुरस्काराचे स्वरुप: रोख रक्कम रु.५१,०००/- (रुपये एकावन्न हजार फक्त) सन्मानपत्र व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे स्मृतिचिन्ह असे राहील.
२. पुरस्काराचे वितरण: "अहिल्यारत्न" पुरस्काराचे वितरण विद्यापीठाच्या नामविस्तार दिनाच्या सोहळयावेळी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल.
३. नामनिर्देशनपध्दत: सदरील पुरस्कारासाठी पुरस्कारार्थीची निवड करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शोध समिती गठीत करण्यात येईल. सदरील समितीची संरचना खालीलप्रमाणेअसेल:

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्कार शोध समिती

| | | |
|---|---|---|
| १ | मा.कुलगुरु, पुअहोसोविसो | अध्यक्ष |
| २ | मा.प्र-कुलगुरु, पुअहोसोविसो | सदस्य |
| ३ | मा.कुलसचिव, पुअहोसोविसो | सदस्य |
| ४ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (संस्थाचालक) | सदस्य |
| ५ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (प्राध्यापक) | सदस्य |
| ६ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (पदवीधर) | सदस्य |
| ७ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (अधिष्ठाता मानवविज्ञान विद्याशाखा) | सदस्य |
| ८ | मा.कुलगुरु नामनिर्देशित महिला प्रतिनिधी (सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय आदी क्षेत्रातील नामवंत व्यक्ती) | सदस्य |
| ९ | मा. संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आध्यासन | सदस्य |

उपरोक्त प्रमाणे समिती "अहिल्यारत्न" पुरस्कारासाठी एका व्यक्तीची निवड करुन तशी शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करेल. तथापि, शोध समितीस योग्य व्यक्ती न आढळल्यास समिती त्यावर्षी "अहिल्यारत्न" पुरस्कारसाठी निरंक अशी शिफारस करेल.

४. पुरस्कारार्थी नामनिर्देशनासाठीचे विविध क्षेत्र:

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कारकिर्दीत जे नैतिक अधिष्ठान ठेवून लोकोपयोगी राज्य कारभार केला त्यांचा आदर्श मानून खालील क्षेत्रात नाविण्यपूर्ण समाजपयोगी उल्लेखनिय कार्य केलेले असावे.

अ. कला, संस्कृती व साहित्य या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

ब. शिक्षण, संशोधन, क्रीडा या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

क. सामाजिक, राजकीय, प्रशासन, व्यवस्थापन, महिला सबलीकरण या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

ड. कृषी, उद्योग, व्यापार या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

इ. पर्यावरण, जलव्यवस्थापन, कौशल्य विकास या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

याक्षेत्रात जे कार्य केलेलेआहे ते कार्य नाविन्यपूर्ण व समाजोन्नतीचे असावे.

नामनिर्देशनाचे निकष:

१. सदर पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या व्यक्तीची जनमानसात स्वच्छ प्रतिमा असावी आणि त्यांचे नैतिक अधिष्ठान व कार्य इतरांना मार्गदर्शक ठरावे. ती व्यक्ती निष्कलंक असावी आणि त्यांच्याविरुध्द कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयाची नोंद नसावी.
२. पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या/नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या हयात व्यक्तीचे वय ६० वर्ष पुर्ण किंवा त्यापेक्षा अधिक असावे.
३. पुरस्काराची व्याप्ती ही राष्ट्रीय स्तरापर्यंत असेल.
४. पुरस्कार विभागून दिला जाणार नाही.
५. पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती आढळून न आल्यास पुरस्कार त्यावर्षी घोषित केला जाणार नाही.
६. सदर पुरस्कार मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही.

५. इतर माहिती:

पुरस्काराच्या निवडीसाठी शोध समिती त्या-त्या क्षेत्रातवर निर्देशित समकक्ष पातळीवर कसोट्या लावून "अहिल्यारत्न" पुरस्कारासाठी एका व्यक्तीची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करेल. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर पुरस्कार जाहिर करण्यात येईल.

सबब, अहिल्यारत्न पुरस्कारासाठी उक्तप्रमाणे तयार करण्यात आलेली नियमावली विचारार्थ.

**ठराव:** **अहिल्यारत्न पुरस्काराची नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने तयार केलेली नियमावलीस खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्कार शोध समिती मधील अ.क्र.७ मा. व्यवस्थापन परिषद सदस्य (अधिष्ठाता मानवविज्ञान विद्याशाखा) ऐवजी अधिष्ठाता अशी दुरुस्ती करण्यात यावी असे ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **विद्यापीठातील वर्ग १ च्या अधिकाऱ्यांना विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ लोगो असलेला ब्लेझर देण्याबाबत दि.१४/०७/२०२५ रोजीच्या बैठकीचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: दि.१४/०७/२०२५ रोजी विद्यापीठ वर्धापन दिन पुर्व तयारीसाठी मा. प्र-कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विविध मुद्दाबाबत चर्चा करण्यात आली. त्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी विद्यापीठातील वर्ग १ च्या अधिकाऱ्यांना विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ लोगो असलेला ब्लेझर देण्यात यावी अशी विनंती केली. सदर विनंतीबाबतचा विषय आगामी व्यवस्थापन परिषदेमध्ये आस्थापना विभागामार्फत ठेवण्यास ठरले. विद्यापीठातील वर्ग १ च्या अधिकारी सदर विनंती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवावे असे ठरले.<br>त्यानुसार सदर बैठकीचा कार्यवृतांनुसार विद्यापीठातील वर्ग १ च्या अधिकाऱ्यांना विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ लोगो असलेला ब्लेझर देण्यात यावेत.<br>सबब, विद्यापीठातील वर्ग १ च्या अधिकाऱ्यांना विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ लोगो असलेला ब्लेझर देण्याबाबत दि.१४/०७/२०२५ रोजीच्या बैठकीचा अहवाल विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **विद्यापीठातील वर्ग १ च्या अधिकाऱ्यांना विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ लोगो असलेला ब्लेझर देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सामंजस्य (MoU Draft) करारास मान्यता मिळण्याची बाब पुनश्चः विचारार्थ.**<br>टिपणी: हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी स्टेडियम/ ग्राऊंड बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सांमंजस्य (MoU Draft) करारा स संदर्भात MoU Cell यांचे दि.२८/०३/२०२५ रोजी बैठक संपन्न झालेला असून ठराव सोबत जोडलेला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी हॉकी या खेळाचा प्रसार होवून विद्यापीठ व विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांना हॉकी विषयी आवड निर्माण होवून चांगले खेळाडू तयार व्हावेत तसेच हॉकी खेळाचे अद्यावत मैदान/स्टेडियम व सुविधा मिळण्याच्या हेतूने प्रस्तुत विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनी पैकी सर्वे क्र.३६५ व ३६६ पैकी १२ एकर जमिनीवर हॅाकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर यांच्या मार्फत हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यात येणार आहे. तसेच हॅाकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर यांच्या दि.२७/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील पारित करण्यात आलेल्या ठरावानुसार विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या जमिनीवर व त्यावरील बांधण्यात येणाऱ्या हॉकी मैदान व स्टेडियम इत्यादिवर हॅाकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर कधीही कोणत्याही प्रकारचे मालकी हक्क अथवा अधिकार सांगणार नाही सदरची मिळकत ही विद्यापीठाच्या मालकीची असून विद्यापीठाचीच राहणार आहे याबाबत संघटनेचे सचिव श्री.अजय श्रीशैल चाबुकस्वार यांच्या वतीने हमीपत्र लिहून दिले आहे. सोबत हॅाकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर यांचा ठराव हमीपत्र जोडलेला आहे.<br>सबब, हॅाकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सामंजस्य (MoU Draft) करारास मान्यता मिळण्याचीबाब पुनश्चः विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **हॅाकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सामंजस्य (MoU Draft) करारास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना तसेच त्यांचे संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविधीक अधिकारी यांना विद्यापीठाकडून ब्लेझर देण्यासाठी नामनिर्देशित समितीची शिफारस विचारार्थ.** | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |

टिपणी: प्रती वर्षी प्रस्तुत विद्यापीठात दि.२९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. सदर कार्यक्रमात AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धेत तसेच क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्यप्राप्त व सहभागी खेळाडूंना तसेच त्यांचे संघप्रशिक्षक / संघ व्यवस्थापक आणि विद्यापीठातील सांविधीक अधिकारी यांच्या साठी प्रस्तुत विद्यापीठाकडून देण्यात येणारे ब्लेजरचे कापड व ब्लेजरचा रंग ठरविण्यासाठी समितीची बैठक बुधवार दि.१६/०७/२०२५ रोजी दुपारी ०४:०० वा. मा. कुलसचिव कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे समितीने The Raymond Shop सोलापूर येथे प्रत्यक्ष भेट देवून Raymond कंपनीचे कापड व रंग याबाबत पहाणी केली असता खालील तपशिला नुसार व दरानुसार ब्लेझर तयार करून घेण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

| अ. क्र. | ब्लेझर | Qty | Rate | Amount | Total Amount | ब्लेझरचा रंग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य कोड नं. ००५३८४/००९ Raymond | ०२ | कापड दर रु. ११५३/- | २३०६/- | ५८०६/- | Blue |
| | | ०१ | शिलाई रू. | ३५००/- | | |
| | | | Net Amount | | ४५००/- | |
| २ | प्रस्तुत विद्यापीठातील सांविधीक अधिकारी Raymond - Bonanza कोड नं. १०७४५३/००७ | ०२ | कापड दर रु. ५६४ /- | ११२८/- | ४६२८/- | Wine |
| | | ०१ | शिलाई रू. | ३५००/- | | |
| | | | Net Amount | | ३५००/- | |
| ३ | AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धेत तसेच क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्यप्राप्त व सहभागी खेळाडू आणि सर्व क्रीडा प्रकाराचे संघप्रशिक्षक व संघव्यवस्थापक Raymond - Poly viscose | ०२ | कापड दर रु.५२५ /- | १०५०/- | ४५५०/- | Gray |
| | | ०१ | शिलाई रू. | ३५००/- | | |
| | | | Net Amount | | ३५००/- | |

| | | |
|---|---|---|
| | तरी वरील प्रमाणे नमुद केलेल्या कपडयाच्या कोडनंबर, दर व कलरनुसारच खरेदी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना तसेच त्यांचे संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविधीक अधिकारी यांना विद्यापीठाकडून ब्लेझर देण्यासाठी नामनिर्देशित समितीची शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना तसेच त्यांचे संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांना व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविधीक अधिकारी यांना विद्यापीठाकडून ब्लेझर देण्यासाठी हस्तपोच निविदा मागविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

Mahde

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १८ ] | विद्यापीठाची टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH १३ AZ २६४९, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ५८२०, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ६८१९ व टोयोटा फोर्च्युनर वाहन क्र. MH १३ AZ ९५३१ ही वाहने बायबॅक करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी: उपरोक्त विषयांकीतप्रमाणे विद्यापीठाची टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH १३ AZ २६४९, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ५८२०, महिंद्रा बोलेरो वाहन क्र.MH १३ AZ ६८१९ व टोयोटा फोर्च्युनर वाहन क्र.MH १३ AZ ९५३१ या वाहनांच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील नोंदीनुसार वयोमान कमी होत आले आहे.

वरील वाहनाच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालाकडील नोंदीचा व आयुर्मान संपण्याच्या नोंदीचा कालावधी खालील तक्त्यात नमुदप्रमाणे आहे.

| अ.क्र | वाहनाचा प्रकार | वाहनाचा नंबर | उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे वाहन नोंदणी झालेला दिनांक | उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील वाहन नोंदणी दिनांकानुसार वाहन अंतिम आयुर्मान दिनांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | टोयोटा इटिऑस | MH १३ AZ २६४९ | ०२/०१/२०१२ | ०१/०१/२०२७ |
| २ | महिंद्रा बोलेरो | MH १३ AZ ५८२० | २९/१०/२०१२ | २८/१०/२०२७ |
| ३ | महिंद्रा बोलेरो | MH १३ AZ ६८१९ | ०२/०१/२०१३ | ०१/०१/२०२८ |
| ४ | टोयोटा फोर्च्युनर | MH १३ AZ ९५३१ | १७/०९/२०१३ | १६/०९/२०२८ |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठाच्या वाहनांचे त्या - त्या वाहनांच्या समोर रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तारखेला वयोमान संपणार आहे.

मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र क्रमांक एमव्हीआर-११८८/सीआर-४६४/का.२(३) जा.क्र.१७५ या पत्राच्या अनुषंगाने केंद्रशासनाच्या Scheme For Special Assistance to Status for Capital Investment For २०२२-२३ अंतर्गत प्राप्त निर्देशानुसार नोंदणी दिनांकापासून १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने निष्कासीत (Scrap) करण्यासंदर्भात निर्देश जारी झालेबाबत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचेकडून दि.०६/०१/२०२३ रोजीच्या ई मेल सोबत प्राप्त झालेल्या जा.क्र.६३/आस्थापना विभाग/ उपप्रापका/ सोलापूर/ २०२२ दि.०५/०१/२०२३ रोजीच्या पत्रानुसार या कार्यालयास कळविले आहे.

तसेच महाराष्ट्र शासन परिवहन आयुक्त यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. एमव्ही आर-११८८/सीआर-४६४A/का.२(३) जा.क्र८४७१ दि.२०/०७/२०२३ या पत्रानुसार शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे (S.T.U) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य शासनाच्या मालकीच्या वा नियंत्रणाखालील स्वायत्त संस्था/मंडळे इ. यांचे नावे नोंदणीकृत असणारी १५ वर्षे पेक्षा जास्त वयाची वाहने स्क्रॅप/मोडीत काढण्याची प्रक्रिया पूर्ण राज्यात सुरू आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त पत्रांच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, उपरोक्त तक्त्यात

नमुदप्रमाणे विद्यापीठाची वाहने संबंधीत वाहनाच्या रकाना क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांकास स्क्रॅप होणार आहेत. उपरोक्त पत्रातील निर्देशानुसार सदर वाहनांचे वयोमान स्तंभ क्र.५ मध्ये नमुद दिनांकाच्या पुढे वाढवता येणार नाही.

तसेच उपरोक्त वाहने जुनी झाली असल्यामुळे सर्व्हिसींग व दुरूस्तीचा खर्च मोठया प्रमाणात काढत आहेत. सदर वाहनांचा या पुढे जास्त वापर झाल्यास वाहनाची किंमत कमी होत जाणार आहे. त्याचप्रमाणे सदरची वाहने उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे रकाना क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या त्या वाहनाच्या वयोमानाच्या अंतिम दिनांकापर्यंत वापरल्यास वाहने संबंधीत वाहनाच्या कंपनीकडे बायबॅक करता येणार नाहीत किंवा विकता ही येणार नाहीत. वाहनाचे वयोमान १५ वर्षे पुर्ण झाले असल्यामुळे वाहने निष्काषीत (Scrap) होणार आहेत. त्यामुळे वरील तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठाची वाहने संबंधीत कंपनीच्या सोलापूर शहरातील शोरूमकडे बायबॅक करण्याची प्रक्रिया करावी अशी या विभागाची धारणा आहे.

वरील विषयांकीत वाहनामधील टोयोटा फोर्च्युनर वाहन क्र. MH १३ AZ ९५३१ हे वाहन मा.कुलगुरू महोदय यांच्याकरिता व टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH १३ AZ २६४९ हे वाहन मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेसाठी वापरात आहे. तसेच बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ५८२० व बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ६८१९ ही वाहने विद्यापीठाच्या विविध संकुलांच्या व प्रशासकीय विभागांच्या वापरात आहेत.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण - २०२१/ प्र.क्र.१५८/२१ विशि-१ दि.०८ सप्टेंबर, २०२१ या शासन निर्णयान्वये अकृषी विद्यापीठासाठी वाहनांची किंमत मर्यादा विहीत करण्यात आली आहे. त्यामध्ये क्र.१ नुसार मा.कुलगुरू व क्र.३ नुसार कुलसचिव/ संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ/वित्त व लेखा अधिकारी यांच्याकरिता वाहन खरेदी किंमत मर्यादा खालीलप्रमाणे विहीत करण्यात आली आहे.

| अ. क्र. | पदाधिकारी/ अधिकारी पदनामे | वाहनांचा प्रकार | किंमत मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरू | त्यांच्या पसंतीनुसार तथापि स्तंभ क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रू. १२.०० लक्ष (वाहनाची किंमत + वस्तू व सेवा कर + टेम्पररी रजिस्ट्रेशन + सहाय्यभूत साहित्य (Accessories) ईत्यादी अंतर्भूत करून एकूण रू.१२.०० लक्षच्या मर्यादेत) |
| २. | कुलसचिव/ संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ/वित्त व लेखा अधिकारी | ----------"----- ----------- | रू. ९.०० लक्ष (वाहनाची किंमत + वस्तू व सेवा कर + टेम्पररी रजिस्ट्रेशन + सहाय्यभूत साहित्य (Accessories) ईत्यादी अंतर्भूत करून एकूण रू.९.०० लक्षच्या मर्यादेत) |

वरीलप्रमाणे विषयांकीत वाहनामधील,

१. टोयोटा फोर्च्युनर वाहन क्र. MH १३ AZ ९५३१ व टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH १३ AZ २६४९ ही २ वाहने टोयोटा कंपनीच्या सोलापूर शहरातील मे. राजयोग टायोटा ॲटो प्रा. लि. सोलापूर यांचेकडे बायबॅक करून जुन्या वाहनाची बायबॅक

| | | |
|---|---|---|
| | किंमत + शासन निर्णयातील वाहनाची किंमत मर्यादा = BS६ Norm ची कोणती वाहने खरेदी करता येतील?<br>२. बोलरो वाहन क्र. MH १३ AZ ५८२० व बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ६८१९ ही २ वाहने महिंद्रा कंपनीच्या सोलापूर शहरातील मे. गांधी मोटार्स, सोलापूर यांचेकडे बायबॅक करून जुन्या वाहनांची बायबॅक किंमत काढून घेऊन नवीन BS६ Norm ची बोलेरो वाहने खरेदी करणेसाठी किती किंमत अदा करावी लागेल?<br>वरीलप्रमाणे १ साठी मे. राजयोग टायोटा ॲटो प्रा. लि. सोलापूर यांचेकडून व २ साठी मे. गांधी मोटार्स, सोलापूर यांचेकडून पत्रव्यवहार करून माहिती घेऊन वाहने बायबॅक करण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे.<br>सबब विद्यापीठाची टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH १३ AZ २६४९, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ५८२०, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ६८१९ व टोयोटा फोर्च्युनर वाहन क्र. MH १३ AZ ९५३१ ही वाहने बायबॅक करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **दोन नवीन बोलेरो खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तद्नंतर महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ५८२० व महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH १३ AZ ६८१९ या दोन बोलेरो वाहनांचे लिलाव करण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.**<br>**तसेच विद्यापीठाची टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH १३ AZ २६४९ व टोयोटा फोर्च्युनर वाहन क्र. MH १३ AZ ९५३१ ही वाहने बायबॅक करण्यात यावेत असेही सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | दि.०२/०७/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.१६/०४/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिनांक ०२/०७/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.०२/०७/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृतांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [२०(१)] | डॉ. शैलेंद्र देवळणकर, प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३० मे २०२५ रोजीच्या ई-मेल नुसार विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय पंचवार्षिक बृहत विकास आराखडा संदर्भात नामांकित सदस्य म्हणून प्रा. डी. टी. शिर्के, साधन व्यक्ती (Resource Person) यांनी मार्गदर्शन केल्यानुसार तयार करण्यात आलेला बृहत आराखडा बैठकीचा कार्यवृत्तांत अधिकच्या सूचना करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ<br><br>टिपणी: डॉ. शैलेंद्र देवळणकर, प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे विद्यापीठास प्राप्त झालेले दि.३०/५/२०२५ रोजीच्या ई-मेल नुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठांचे पंचवार्षिक बृहत आराखडा करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व घटक ठरविण्यासाठी श्री. अनिल राव, माजी प्राचार्य, एम. जे. कॉलेज, जळगाव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच प्रस्तुत विद्यापीठास नामांकित सदस्य म्हणून प्रा. डी. टी. शिर्के, साधन व्यक्ती (Resource Person) कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यानुसार त्यांना साधन व्यक्ती म्हणून विद्यापीठ स्तरीय गठीत बृहत आराखडा समिती समोर मार्गदर्शन करणे कामी विनंती करण्यात आली होती त्यानुसार त्यांनी विद्यापीठात येऊन बृहत आराखडा विशेष समितीस दि.०७/०७/२०२५ रोजी मार्गदर्शन केले. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत अंतिम करण्यासाठी दि.२२/०७/२०२५ रोजी मा. कुलगरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. प्र-कुलगुरु महोदयांच्या विशेष उपस्थितीत सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांची बैठक संपन्न झाली सदर बैठकीत सोबत जोडलेला कार्यवृत्तांत तयार करण्यात आलेला आहे.<br>सबब, डॉ. शैलेंद्र देवळणकर, प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३० मे २०२५ रोजीच्या ई-मेल नुसार विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय पंचवार्षिक बृहत विकास आराखडा संदर्भात नामांकित सदस्य म्हणून प्रा. डी. टी. शिर्के, साधन व्यक्ती (Resource Person) यांनी मार्गदर्शन केल्यानुसार तयार करण्यात आलेला बृहत आराखडा बैठकीचा कार्यवृत्तांत अधिकच्या सूचना करण्याकरिता विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | डॉ. शैलेंद्र देवळणकर, प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३० मे २०२५ रोजीच्या ई-मेल नुसार विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय पंचवार्षिक बृहत विकास आराखडा संदर्भात नामांकित सदस्य म्हणून प्रा. डी. टी. शिर्के, साधन व्यक्ती (Resource Person) यांनी मार्गदर्शन केल्यानुसार तयार करण्यात आलेला बृहत आराखडा बैठकीच्या कार्यवृत्तांतात सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(२)] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत प्रस्तुत विद्यापीठात आंतर-विद्यापीठीय महिला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महिला विकास कक्षामार्फत प्रस्तुत विद्यापीठात आंतर-विद्यापीठीय महिला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन करणेबाबत दि.०४/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत सर्वानुमते ठरले व सदर बैठकीचा कार्यवृत्तांतास मा. अध्यक्ष यांनी परवानगी दिली असल्याने सदरचा विषय क्रीडा व शारीरिक शिक्षण या विभागाकडे आयोजनास्तव अग्रेषित करण्यात आलेला होता.<br>सदरच्या स्पर्धा आयोजन करण्याकरीता महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना निमंत्रित करणे, सहभागी सर्व स्पर्धक तसेच स्पर्धेकरीता परीक्षक यांना विद्यापीठात उपस्थित राहून स्पर्धा पार पाडण्याकरीता येणारा खर्च तसेच स्पर्धकाकरीता स्पोर्ट ट्रॅकसुट, भोजन, निवास व्यवस्था, प्रवास भत्ता, मानधन, विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके, सहभागी प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक खर्च अंदाजे रक्कम रु.५,००,०००/- इतका अपेक्षित आहे. यास्तव क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडून स्पर्धा आयोजन व नियोजनास मान्यता असावी. तसेच होणाऱ्या स्पर्धेचा सर्व खर्च क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडील अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास मान्यता असावी.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत प्रस्तुत विद्यापीठात आंतर-विद्यापीठीय महिला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन करण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत प्रस्तुत विद्यापीठात आंतर-विद्यापीठीय महिला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(३)] | **खरेदी व भांडार विभागामार्फत प्रसिध्द करण्याता येणाऱ्या ई-निविदा व GeM Portal वरील कामकाज करण्यासाठी अनुभवी समन्वयक (तज्ञ) यांच्याकडून मानधन तत्वावर सेवा घेण्याची बाब विचारार्थ.** | वित्त व लेखा विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात समान लेखा संहिता (Common Account Code) च्या ४.६.१ (Procedure for Purchase of stores; Machinery etc.) मधील तरतूदीप्रमाणे खरेदी व भांडार विभाग सुरु करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने दि.१३/१२/२०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली. त्यानुसार वित्त व लेखा विभागाअंतर्गत सदर विभागाची स्थापना करुन कामकाज सुरु करण्यात आलेले आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत विभागाकडे सर्व विद्यापीठाची खरेदी प्रक्रिया असल्यामुळे कामाचा आवाका वाढलेला आहे तसेच विद्यापीठास मंजूर झालेल्या पीएम उषा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या अनेक मोठ्या ई-निविदा प्रसिध्द करुन त्याची कार्यवाही तसेच GeM Portal वरील खरेदी ही विभागामार्फत केली जात आहेत.

शासनाची विविध शासन निर्णय, खरेदी प्रक्रियेमधील बारकावे, शासनाचे धोरण व विद्यापीठ हिताच्या दृष्टीने साहित्य खरेदी करताना GeM, Tender and Quotation ही तांत्रिक प्रक्रिया आहे. सदरची प्रक्रिया ही अत्यंत किचकट आहे. त्यामुळे यामध्ये त्रुटी राहण्याची शक्यता आहे.

तसेच ई-निविदा तयार करणे व GeM Portal वर खरेदी करणे सुरळीतपणे व त्रुटी विरहित होणे क्रमप्राप्त आहे. की ज्यामुळे भविष्यामध्ये लेखापरिक्षणामध्ये खरेदी प्रक्रियेसंदर्भात कोणताही आक्षेप उपस्थित राहणार नाही याकरिता अनुभवी समन्वयक (तज्ञ) यांच्याकडून ई-निविदा प्रसिध्द करणे व GeM Portal वरुन खरेदी प्रक्रिया करण्यासाठी सेवा घेतल्यास सदरचे कामकाज सुरळीतपणे पार पडेल व भविष्यात कोणतीही अडचण येणार नाही. याबाबत माहिती घेतली असता, सोबत जोडलेल्या M/S. Ken Advisory Services या फर्मने खालीलप्रमाणे मानधन घेऊन सेवा देण्याची तयारी दर्शविली आहे.

| Sr. No. | Description of Services on Offer | Qty | Charges Per Tender | GST १८% | Total Charges per Tender |
|---|---|---|---|---|---|
| १. | Preparation of RFP/Tender documents for the projects, with the estimated cost up to Rs.१ Crore | ०१ | ३,०००/- | ५४०/- | ३,५४०/- |
| २. | Preparation of RFP/Tender documents for the projects, with the estimated cost more than Rs. १ Crore | ०१ | ५,०००/- | ९००/- | ५,९००/- |

सबब, वित्त व लेखा विभागाकडील खरेदी विभागामार्फत होणारी ई-निविदा व GeM Portal वरील खरेदी प्रक्रिया निकोप व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी M/S. Ken Advisory Services या फर्मची मानधन तत्वावरील सेवा घेण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **खरेदी व भांडार विभागामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या ई-निविदा व GeM Portal वरील कामकाज करण्यासाठी सक्षम व अनुभवी फर्म किंवा व्यक्तीस मानधन / शुल्क देऊन सेवा घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(४)] | **विद्यापीठाच्या ४८२ एकर कार्यक्षेत्राच्या जमिनीवरील विविध कामासाठी ट्रॅक्टर वाहन खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठाच्या केगांव परिसरात विविध इमारतींचे बांधकाम, अंतर्गत रस्ते व विविध विकास कामे करण्यात आली आहेत.<br>मौजे कोंडी येथील ४८२ एकर परिसरात विविध इमारतींचे बांधकाम, खेलो इंडिया योजनेअंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधणे, अंतर्गत रस्ते तयार करणे, पीएम उषा योजनेअंतर्गत विविध इमारतींचे बांधकाम करणे व विविध विकास कामे करावयाची आहेत. सदर परिसरामध्ये येणा-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसून तेथील उपलब्ध मुरुम, दगड व माती इ. साह्याने रस्ता तयार करुन घ्यावा लागणार आहे. तसेच सदर संपूर्ण परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यासाठी खड्डे खोदणे व चरी मारावी लागणार आहे.<br>सद्यस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विविध प्रकारच्या १ लक्ष वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी व विविध घटाकांकडून वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. त्यामूळे वरीलप्रमाणे कामाच्या अनुषंगाने विद्यापीठासाठी नवीन ट्रॅक्टर वाहन खरेदी करण्याची गरज भासत आहे.<br>सबब, विद्यापीठाच्या ४८२ एकर कार्यक्षेत्राच्या जमिनीवरील विविध कामासाठी ट्रॅक्टर वाहन खरेदी करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठाच्या ४८२ एकर कार्यक्षेत्राच्या जमिनीवरील विविध कामासाठी एक नवीन ट्रॅक्टर वाहन खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(५)] | **परकीय भाषांचे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सोलापूर शहरातील डॉ. कोटणीस स्मारक येथील हॉल ३० वर्षाकरीता भाडेपट्टा (Lease) पध्दतीने घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने सोलापूर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक येथे परकीय भाषा (चिनी, रशियन, जर्मन, फ्रेंच, जापनीज, स्पॅनिश, इंग्रजी) या विविध भाषा विषयीचे कौशल्य आधारित अभ्यासक्रम सुरु करावयाचे आहेत.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राद्वारे विविध कौशल्य आधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. वरीलप्रमाणे परकीय भाषांच्या कौशल्य आधारीत अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सोलापूर शहर व जिल्ह्यातील तरुणांना परदेशी भाषासंदर्भातील विविध संधीद्वारे रोजगार उपलब्ध होणार आहे. याचबरोबर सोलापूर शहरवासियांना परकीय भाषांबरोबरच प्रोदशिक अभ्यासक्रम शिकण्याची देखील संधी उपलब्ध होणार आहे.<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी भाषा केंद्र सुरु करण्यासाठी भैय्या चौक येथील डॉ. कोटणीस स्मारकाच्या उजव्या बाजुच्या इमारतीमधील तळमजल्यावरील हॉल (खोली ३७ चौ.मी. क्षेत्रफळ) ३० वर्षाकरिता भाडेपट्ट्याने देणेकामी दैनिक --------------- या वृत्तपत्रात दि. --/---/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द केली आहे.<br>सदरील हॉलकरिता ₹८,०००/- (अक्षरी - आठ हजार रुपये फक्त) प्रति महिना व प्रवेश फी विना अनुदान ₹ ५,०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये फक्त) अशी जाहिरात प्रसिध्द केली असून इच्छुक शैक्षणिक संस्था यांचेकडून दि. ०६/११/२०२३ रोजीचे अधिसुचनेत नमुदप्रमाणे दि. ०१/०८/२०२५ पर्यंत अर्ज सादर करणेसंदर्भात आवाहन करण्यात आले आहे.<br>विद्यापीठाच्या या लोकाभिमुख, रोजगारक्षम व कौशल्य आधारित परकीय भाषांचे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीचे शहरातील डॉ. कोटणीस स्मारक येथील हॉल ३० वर्षाकरिता भाडेपट्टा (Lease) पद्धतीने घेण्याकरिता आणि त्याअनुषंगाने होणाऱ्या अनुषंगिक खर्चाची बाब विचारार्थ. | परकीय भाषा विभाग |
| ठराव: | **विविध भारतीय व परकीय भाषांचे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सोलापूर शहरातील डॉ. कोटणीस स्मारक येथील हॉल ३० वर्षाकरीता भाडेपट्टा (Lease) पध्दतीने घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच सदरील हॉलकरिता ₹८,०५०/- (अक्षरी रुपये आठ हजार पन्नास फक्त) प्रति महिना देण्यास व परकीय भाषांचे अभ्यासक्रमासाठी प्रवेश फी ₹५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(६)] | मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांचे क्र.विससं/उशि/सोविसो/२०२५, दि.२४/०६/२०२५ रोजीचे श्री. रविंद्र महादेव कोरे यांना प्रस्तुत विद्यापीठ सेवेत **समायोजन करणेबाबत निर्णय घेणेबाबतचे पत्र विचारार्थ.**<br>टिपणी: संदर्भ: १) प्रस्तुत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा दि.१३/०३/२०२३ रोजीचा ठराव<br>२) विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२३/३३५७, दि.२४/०५/२०२३<br>३) उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.२३९/२०/विशि-१, दि.१४/०६/२०२३<br>४) त्रिसदस्यीय समितीचा दि.२०/०७/२०२३ रोजीचा अहवाल<br>५) प्रस्तुत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा दि.२४/०७/२०२३ रोजीचा ठराव<br>६) विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२३/२८७५, दि.०२/०८/२०२३<br>७) उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.२३९/विशि-१, दि.११/०८/२०२३<br>८) प्रस्तुत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची दि.१९/०७/२०२४ रोजीचा ठराव क्र.१८<br>९) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/आस्था/२०२४/८२५२, दि.०७/११/२०२४<br>१०) सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांचे पत्र क्र.विससं/उशि/सोविसो/२०२५, दि.२४/०६/२०२५<br>उपरोक्त संदर्भ क्र.१० नुसार मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी दि.०७/११/२०२४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा. विभागीय सहसंचालक, मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य व कुलसचिव यांचे समवेत दि.१८/०६/२०२५ रोजी सविस्तर झालेल्या चर्चेनुसार श्री. रविंद्र कोरे यांना विद्यापीठाने सेवेतून कमी करुन त्यांच्या पदावर व्यवस्थापन परिषदेतील ठरावाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये झालेल्या तडजोडीनुसार श्री. पवार यांना हजर करुन घेतलेले आहे. शासन नियमानुसार एखादया पदावर रितसर नेमणूक केल्यास त्याच पदावरील एका कर्मचाऱ्यास वेतन अदा करता येते. श्री. कोरे यांना विद्यापीठातील अन्य समकक्ष पदावर समायोजन करावयाचे झाल्यास तशी तरतूद प्रचलित शासन नियमात नाही. तथापि, श्री. कोरे यांनी केलेल्या एकंदरीत सेवेचा विचार करता, विद्यापीठातील अन्य समकक्ष पदावर समायोजन करावयाचे झाल्यास त्यास विशेष बाब म्हणून शासनाची पुर्वपरवानगी मिळणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की,<br>१) प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१३/०३/२०२३ रोजीच्या १५४ व्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दि.०१/०३/२०२३ रोजी झालेल्या १५३ व्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली व श्री. रविंद्र कोरे यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून सद्य:स्थितीत बाहय स्त्रोतामार्फत कंत्राटी लेखनिक या पदावर घेण्यात यावे व त्यांचे नियमित पदावर समायोजन करणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवावा असा ठराव झाला आहे.<br>२) त्यानुसार व्यवस्थापन परिषदेच्या दि.०१/०३/२०२३ व दि.१५/०८/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार श्री. कोरे रविंद्र यांना माहे १७ ऑगस्ट, २०२३ पासून कंत्राटी लेखनिक या पदावर रु.२५,०००/- प्रतिमाह इतक्या एकत्रित वेतनावर घेण्यात आलेले आहे तसेच श्री. कोरे रविंद्र यांच्या समायोजनाचा प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडे विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२३/३३५७, दि.२४/०५/२०२३ अन्वये पाठविण्यात आला होता. | आस्थापना विभाग |

३) त्यास अनुसरुन उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.२३९/२०/विशि-१, दि.१४/०६/२०२३ या पत्रान्वये श्री. रविंद्र महादेव कोरे यांना नियुक्ती देण्याची बाब विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आहे. याबाबत समकक्ष पदाची रिक्तता विचारात घेवून तसेच विहीत कार्यपध्दती व नियमातील तरतूदींचा विचार करुन श्री. कोरे यांच्या समायोजनाबाबतच्या विंनतीच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर निर्णय घेण्यात यावा असे विद्यापीठास कळविण्यात आले.

४) उक्त शासनाच्या दि.१४/०६/२०२३ च्या पत्रानुसार श्री. कोरे यांच्या समायोजनाबाबत व्यवस्थापन परिषदेने पारीत केलेल्या ठरावानुसार विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/आस्था /२०२३/४४३६, दि.१७/०७/२०२३ नुसार त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येवून सदर समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी आपल्या अहवालात "रेकॉर्ड किपर-नि-लिपिक व कनिष्ठ लिपिक दोन्ही पदे एकमेकांस समतुल्य आहेत. विद्यापीठांतर्गत रिक्त पदाचा तक्ता अभ्यासला असा १४ कनिष्ठ लिपिक पदे रिक्त दिसून येतात. सेवा प्रवेश नियम २०१७ तील नियम क्र.४ नुसार श्री. रविंद्र महादेव कोरे यांचे रिक्त कनिष्ठ लिपिक पदी त्या दिनांकापासून समायोजन वैध व नियमास धरुन असल्याने त्यांचे समायोजन करावे अशी समितीने शिफारस केली."

५) तद्नंतर १६० व्या व्यवस्थापन परिषदेच्या दि.२४/०७/२०२३ रोजीच्या बैठकीत उपरोक्त त्रिसदस्यीय समितीचा अहवाल विचारार्थ सादर केला असता "मा.उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या नियमित पदावरील समायोजनेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून शासनाकेडे अहवालाच्या अनुषंगाने समायोजनाचा प्रस्ताव पाठवून देण्यात यावा असा ठराव संमत करण्यात आला.

६) विद्यापीठाने नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवाल व व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२३/२८७५, दि.०२/०८/२०२३ रोजी उप सचिव, महराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडे प्रस्ताव पाठवून समायोजनास मान्यता मागीतली असता त्यास अनुसरुन उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.२३९/विशि-१, दि.११/०८/२०२३ या पत्रान्वये श्री. कोरे रविंद्र यांना सेवेत सामावून घेणे नियमास धरुन असल्याचा निष्कर्ष विद्यापीठाच्या स्तरावर गठित करण्यात आलेल्या समितीने काढला आहे. त्यानुषंगाने व्यवस्थापन परिषदेने पारीत केलेला ठराव विचारात घेवून प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास अधिनियमातील कोणत्या तरतूदीनुसार अथवा शासन आदेशानुसार मान्यता आवश्यक आहे, याबद्दल प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आले नाही. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ५(१२) मधील तरतूदीनुसार विद्यापीठ हे त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी नियुक्ती प्राधिकारी आहे. असे नमूद करुन "श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या संदर्भात विद्यापीठ हेच नियुक्ती प्राधिकारी आहे. यास्तव, श्री. कोरे यांच्या प्रकरणी विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर, तपासून, यथोचित निर्णय घ्यावा" असे पुन्हा कळविलेले आहे.

७) श्री. रविंद्र कोरे यांच्या समायोजनाबाबतचा विषय दि.१९/०७/२०२४ रोजीच्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला असता, श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या समायोजन करण्याबाबत विद्यापीठ कुलसचिव व प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांचेकडे सदरबाबत चर्चा करुन त्यांचे मार्गदर्शन घ्यावे व

तद्नंतर शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविणेबाबत निर्णय घेणेसाठी पुढील येणाऱ्या व्यवस्थापन परिषदेसमोर सदर विषय ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.

८) याअनुषंगाने सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत व प्र. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ यांचे समवेत दि.१८/०६/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये सविस्तर झालेल्या चर्चेनुसार श्री. रविंद्र महोदव कोरे यांना विद्यापीठातील अन्य समकक्ष पदावर समायोजन करावयाचे झाल्यास तशी तरतूद प्रचलित शासन नियमात नाही. तथापि, श्री. कोरे यांनी केलेल्या एकंदरीत सेवेचा विचार करता, विद्यापीठातील अन्य समकक्ष पदावर समायोजन करावयाचे झाल्यास त्यास विशेष बाब म्हणून शासनाची पूर्व परवानगी घ्यावी असे कळविले आहे.

९) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र.SUS/२००९/३९०(०९)/ विशि-१, दि.१९/०९/२००९ अन्वये २१० पदांस पदनिहाय मंजूरी दिलेली आहे.

प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ३ व ४ ची मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अक्र | पदाचे नाव | एकूण मंजूर पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गट-क | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण |
| १ | सहा. कक्ष अधिकारी | -- | ११ | ११ | -- | ११ | ११ | -- | -- | -- |
| २ | सांख्यिकी सहायक | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| ३ | वरिष्ठ ग्रंथालय सहा. | ०३ | -- | ०३ | ०१ | -- | ०१ | ०२ | -- | ०२ |
| ४ | लघुलेखक | -- | ०४ | ०४ | -- | ०३ | ०३ | -- | ०१ | ०१ |
| ५ | कंपाऊंडर | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| ६ | भांडारपाल | ०३ | -- | ०३ | -- | -- | -- | ०३ | -- | ०३ |
| ७ | लघुटंकलेखक | ०३ | -- | ०३ | ०० | -- | ०० | ०३ | -- | ०३ |
| ८ | वरिष्ठ लिपिक | -- | २२ | २२ | -- | २२ | २२ | -- | ०० | ०० |
| ९ | कनिष्ठ लिपिक | २५ | २५ | ५० | २५ | २५ | ५० | -- | -- | -- |
| १० | प्रयोगशाळा सहाय्यक | १२ | -- | १२ | ०८ | -- | ०८ | ०४ | -- | ०४ |
| ११ | रेकॉर्ड कीपर-लिपिक | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| १२ | तारतंत्री | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| १३ | दुरध्वनीचालक | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| १४ | सुतार | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| १५ | नळकारागीर | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- |
| | एकूण | ५३ | ६२ | ११५ | ४१ | ६१ | १०२ | १२ | ०१ | १३ |
| गट-ड | | | | | | | | | | |
| १ | प्रयोगशाळा परिचर | १२ | -- | १२ | ०६ | -- | ०६ | -- | ०६ | -- |
| २ | ग्रंथालय परिचर | ०३ | -- | ०३ | ०२ | -- | ०२ | -- | ०१ | -- |
| ३ | वाहनचालक | ०५ | -- | ०५ | ०४ | -- | ०४ | ०१ | -- | ०१ |
| ४ | झेरॉक्स ऑपरेटर | ०२ | -- | ०२ | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| ५ | चौकीदार | ०३ | -- | ०३ | ०२ | -- | ०२ | ०१ | -- | ०१ |
| ६ | हवालदार | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | -- | -- |
| ७ | जमादार | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | -- | -- |
| ८ | शिपाई | ३८ | -- | ३८ | १७ | -- | १७ | २१ | -- | २१ |
| ९ | स्वच्छक | ०२ | -- | ०२ | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| | एकूण | ६५ | ०२ | ६७ | ३३ | ०२ | ३५ | २५ | ०७ | २५ |

| | | |
|---|---|---|
| | सबब, मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे क्र.विससं/उशि/ सोविसो/२०२५, दि.२४/०६/२०२५ रोजीचे पत्र विचारार्थ. | |
| ठराव: | विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांचे क्र.विससं/उशि/सोविसो/ २०२५, दि.२४/०६/२०२५ रोजीच्या पत्रानुसार श्री. रविंद्र महादेव कोरे यांना प्रस्तुत विद्यापीठ सेवेत समायोजन करणेबाबत शासन मान्यतेच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच सद्यस्थितीत अशा प्रकारच्या इतर काही केसेस असतील तर त्याबाबतही याप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[२०(७)]</td><td colspan="2">परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४७(३)(घ) नुसार मा. प्राचार्य व कलम ४७(३)(च) नुसार अध्यापक यांचे नामनिर्देशन होण्याची बाब विचारार्थ.</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td colspan="2">परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४७(३)(घ) व (च) नुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळावर सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>कलम</td><td>नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचे नाव</td><td></td></tr>
<tr><td></td><td>महाराष्ट्र सार्वाजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४७(३) (घ) नुसार, दोन प्राचार्य</td><td>१) प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे<br>२) प्राचार्य डॉ. सुनिल धोंडिबा हेळकर</td><td></td></tr>
<tr><td></td><td>महाराष्ट्र सार्वाजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४७(३) (च) नुसार, संलग्न महाविद्यालयांमधील एक शिक्षक</td><td>१) डॉ. व्ही. एम. गुरमे</td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद